**ठळक बातम्या**

- संसदेचं अर्थसंकल्पीय अधिवेशन उद्यापासून, राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू दोन्ही सभागृहांच्या संयुक्त बैठकीला संबोधित करणार
- लोकसेवा आयोगाच्या गट ब पदासाठीच्या प्रश्नपत्रिका सुरक्षित असल्याचं MPSC चं स्पष्टीकरण
- माघी गणेशोत्सवासाठीही प्लास्टर ऑफ पॅरिसच्या मूर्तींवरची बंदी मुंबई उच्च न्यायालयाकडून कायम

**आणि**

- राष्ट्रीय क्रीडा स्पर्धेच्या २३ पदकांसह महाराष्ट्र पदक तालिकेत तिसऱ्या स्थानी

**<><><><><>**

संसदेचं अर्थसंकल्पीय अधिवेशनाला उद्या राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या अभिभाषणानं सुरुवात होईल. दोन्ही सभागृहांच्या संयुक्त बैठकीला त्या संबोधित करतील. त्यानंतर आर्थिक सर्वेक्षण अहवाल मांडला जाईल. केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन येत्या शनिवारी अर्थसंकल्प सादर करणार आहेत. सोमवारी राष्ट्रपतींच्या अभिभाषणाबद्दलच्या आभार प्रस्तावावर दोन्ही सभागृहात चर्चा होईल. त्यानंतर अर्थसंकल्पावर १३ फेब्रुवारीपर्यंत चर्चा होईल. अर्थसंकल्पीय अधिवेशनाचं दुसरं सत्र १० मार्चपासून सुरू होईल. या अधिवेशनात १६ विधेयक मांडण्याचं सरकारचं नियोजन आहे.

संसदेच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनाच्या पार्श्वभूमीवर केंद्रसरकारने आज सर्वपक्षीय बैठक बोलावली होती. बैठकीला ३६ विविध पक्षांचे मिळून ५२ खासदार उपस्थित होते असं संसदीय कार्यमंत्री किरेन रिजिजू यांनी बैठकीनंतर बातमीदारांना सांगितलं. अर्थसंकल्पीय अधिवेशनात कामकाज सुरळीतपणे चालवण्याच्या दृष्टीने सहकार्याचं आवाहन यावेळी सरकारतर्फे करण्यात आलं.

संरक्षण मंत्री राजनाथ सिंग, केंद्रीय आरोग्यमंत्री जे. पी. नड्डा, तसंच काँग्रेसचे ज्येष्ठ नेते जयराम रमेश, गौरव गोगोई, तृणमूलचे सुदीप बंदोपाध्याय, समाजवादी पार्टीचे रामगोपाल यादव, बिजू जनता दलाचे सस्मित पात्रा आणि द्रमुकचे टी आर बालू यांच्यासह विविध पक्षांचे खासदार त्यात सहभागी झाले होते.

<><><><><>

राज्यपाल सी पी राधाकृष्णन यांनी महात्मा गांधी यांच्या सत्त्याहत्तराव्या बलिदान दिनानिमित्त आज मुंबईतल्या मणीभवन इथं भेट दिली. महात्मा गांधींच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करुन त्यांनी प्रार्थनासभेत भाग घेतला. या वेळी बोलताना राज्यपालांनी सर्वांना जात, पंथ आणि धर्म यांच्या संकीर्ण मतभेदापलीकडे जाण्याचे आवाहन केलं. विद्यार्थ्यांनी महात्मा गांधींच्या सत्य, अहिंसा आणि सदाचाराच्या विचारांचं पालन करावे, असं आवाहन त्यांनी यावेळी केलं.
राज्यातही यानिमित्त विविध ठिकाणी कार्यक्रमांचं आयोजन झालं होतं.

<><><><><>

नवी दिल्लीत मराठी साहित्य संमेलन होणं ही मराठी माणसासाठी अभिमानाची गोष्ट असल्याचं मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी म्हटलं आहे. ९८व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाच्या नवी दिल्ली इथल्या कार्यालयाचं उद्घाटन फडणवीस यांच्या हस्ते आज झालं, त्यावेळी ते बोलत होते.

<><><><><>

विधानसभा निवडणुकीत मतदारांनी महाराष्ट्र नवनिर्माण सेनेला मतदान केलं, मात्र ते पोहोचलंच नाही, असा आरोप मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांनी केला. ते आज मुंबईत पक्षाच्या पदाधिकारी मेळाव्यात बोलत होते. लोकसभा निवडणुकीत ज्या पक्षांचे जास्त उमेदवार निवडून आले होते, त्यांचे विधानसभेत अगदी थोडे उमेदवार निवडून आले, यावर विश्वास बसत नाही असं ठाकरे म्हणाले. असं होणार असेल तर निवडणूक न लढलेली बरी असं म्हणत ठाकरे यांनी निराशा व्यक्त केली. महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचं काम जनतेपर्यंत पोहोचवलं पाहिजे, असं आवाहनही त्यांनी पदाधिकाऱ्यांना केलं.

<><><><><>

मराठा समाजाला ओबीसी प्रवर्गातून आरक्षण देण्यासह इतर मागण्यांसाठी उपोषणाला बसलेल्या मनोज जरांगे यांनी आज सहाव्या दिवशी उपोषण स्थगित केलं. शिंदे समितीचं काम पुन्हा सुरू करण्यात येईल, मराठा आरक्षण आंदोलकांवर दाखल गुन्ह्यांची तपासणी करून गुन्हे मागे घेण्याची

कार्यवाही सुरू केली जाईल, कुणबी प्रमाणपत्र वाटप करण्यासाठी स्थापन केलेले कक्ष पुन्हा सुरू केला जातील, असं लेखी आश्वासन जालन्याचे जिल्हाधिकारी डॉक्टर श्रीकृष्ण पांचाळ यांनी दिल्यानंतर जरांगे यांनी उपोषण स्थगित करायचा निर्णय घेतला. मात्र, मागण्या मान्य न झाल्यास मुंबईत मोर्चा काढला जाईल, असा इशाराही त्यांनी दिला. त्याआधी बीडचे खासदार बजरंग सोनवणे, आमदार सुरेश धस, प्रकाश सोळंके यांनी जरांगे यांची भेट घेत चर्चा केली. दरम्यान, जरांगे यांना छत्रपती संभाजीनगर इथल्या रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आलं आहे.

<><><><><>

महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या गट ब पदासाठीच्या प्रश्नपत्रिका सुरक्षित असून उमेदवारांनी अपवांवर विश्वास ठेवू नये असं आवाहन आयोगाच्या सचिव डॉ. सुवर्णा खरात यांनी केलं आहे. त्या नवी मुंबई इथं पत्रकारपरिषदेत बोलत होत्या. येत्या रविवारी २ फेब्रुवारी ला 'महाराष्ट्र गट-ब (अराजपत्रित) सेवा संयुक्त पूर्व परीक्षा-२०२४' होणार आहे. त्याची प्रश्नपत्रिका उमेदवारांना उपलब्ध करून देण्याचं आमिष दाखवून पैशाची मागणी केली जात असल्याचं वृत्त पुण्याच्या एका दैनिकात प्रसिद्ध झाल्यानंतर आयोगाने हा खुलासा केला आहे. याप्रकरणी पुणे पोलीस आयुक्तांकडे तक्रार दाखल करण्यात आली आहे.

<><><><><>

फेब्रुवारी-मार्च मधे होणाऱ्या दहावी आणि बारावीच्या परीक्षेत गैरप्रकार झाल्यास परीक्षा केंद्राची मान्यता रद्द करण्याचा इशारा महाराष्ट्र राज्य माध्यमिक आणि  उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाने दिला आहे. तसंच परीक्षा केंद्रावर ज्या शाळांमधील विद्यार्थी परीक्षा देत आहेत, त्या शाळेतील शिक्षक, कर्मचाऱ्यांची नियुक्त न करण्याचा निर्णय राज्य मंडळानं घेतला होता. त्याला संस्थाचालक, शिक्षक संघटनांनी आक्षेप घेतल्यामुळे हा निर्णय बदलण्यात आला आहे. ज्या परीक्षा केंद्रावर मागच्या पाच वर्षांत गैरप्रकार झाले होते त्या शाळांना मात्र हाच निर्णय लागू असेल.

**<><><><><>**

राज्यात माघी गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर प्लास्टर ऑफ पॅरिसच्या मूर्तींवरची बंदी मुंबई उच्च न्यायालयानं कायम ठेवली आहे. मुख्य न्यायाधीश न्यायमूर्ती आलोक आराधे आणि न्यायमूर्ती भारती डांगरे यांच्या पीठानं यासंबंधीचा अंतरिम आदेश आज जारी केला. प्लास्टर ऑफ पॅरिसच्या मूर्तींवर बंदी घालण्याबाबत केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळानं दिलेल्या मार्गदर्शक सूचनांची चोख अंमलबजावणी करण्याची सूचना न्यायालयानं राज्यातल्या स्थानिक यंत्रणांना दिली आहे.

**<><><><><>**

बीड ते मुंबई रेल्वे सुरू करण्याचं सुतोवाच उपमुख्यमंत्री तथा बीडचे पालकमंत्री अजित पवार यांनी केलं आहे. ते आज बीड इथं नियोजन समितीच्या बैठकीनंतर पक्ष कार्यकर्त्यांशी बोलत होते. सर्वांसाठी शिस्तपालन आवश्यक असून, चुकीचं काम केल्यास नियमानुसार कारवाई होणारच, असं

पवार यांनी स्पष्ट केलं. नियोजन समितीच्या बैठकीत जिल्ह्यात एकूण आराखड्यातील ५३६ कोटी ४४ लाख रुपयांच्या कामांना प्रशासकीय मंजूरी देण्यात आली आहे.

<><><><><>

सोलापूर जिल्हा वार्षिक योजना २०२५-२६ च्या १ हजार १९ कोटी ३३ लाख रुपयांच्या प्रारूप आराखड्याला जिल्हा नियोजन समितीनं आज मान्यता दिली आहे. त्यासाठी जिल्हा नियोजन समितीच्या आज झालेल्या बैठकीनंतर पालकमंत्री जयकुमार गोरे यांनी ही माहिती दिली.
जिल्हा वार्षिक योजनेअंतर्गत सर्वसाधारण योजना ८६१ कोटी ८९ लाख, अनुसूचित जाती उपयोजना १५२ कोटी, तर आदिवासी क्षेत्राबाहेरच्या उपयोजना ५ कोटी ४४ लाख रुपयांचा समावेश आहे.

<><><><><>

यवतमाळ जिल्हा नियोजन समितीची बैठकही आज पालकमंत्री संजय राठोड यांच्या अध्यक्षतेखाली झाली. यावेळी सन 2025-26 या आर्थिक वर्षातल्या 659 कोटी रुपयांच्या आराखड्याला मंजूरी देण्यात आली. जिल्हा नियोजन मधून मंजूर झालेला कुठल्याही विभागाचा निधी शिल्लक राहणार नाही, याची दक्षता घ्या, या निधीतून होणारी कामे दर्जेदार आणि वेळेत करा, असे निर्देश राठोड यांनी यावेळी दिले.

<><><><><>

उत्तराखंडमध्ये सुरू असलेल्या ३८व्या राष्ट्रीय क्रीडा स्पर्धेच्या पदकतालिकेत २३ पदकांसह महाराष्ट्राने पदक तालिकेत तिसरा क्रमांक

पटकावला आहे. महाराष्ट्राच्या खात्यात ४ सुवर्ण, ११ रौप्य आणि ८ कास्य पदकांचा समावेश आहे.

या स्पर्धेत ट्रायथलॉन प्रकारात महाराष्ट्राने सहा पदकांची कमाई केली आहे. पार्थ मिरगे, डॉली पाटील, मानसी मोहिते या खेळाडूंनी पदकांची कमाई करत महाराष्ट्राच्या पदकांच्या कमाईत भर टाकली आहे. महिलांच्या ४०० मीटर पोहण्याच्या स्पर्धेत मेडले प्रकारात महाराष्ट्राच्या सानवी देशवाल हिने सुवर्णपदक पटकावलं आहे.

**<><><><><>**

गेल्या चोवीस तासात मध्य महाराष्ट्र, विदर्भ आणि मराठवाड्यात तुरळक ठिकाणी किमान तापमानात वाढ झाली. राज्यात सर्वात कमी किमान तापमान नाशिक इथं १३ पूर्णांक ३ दशांश अंश सेल्सिअस इतकं नोंदवलं गेलं.

येत्या दोन दिवसात राज्यात सर्वत्र  हवामान कोरडं राहण्याची शक्यता पुणे वेधशाळेनं व्यक्त केली आहे.

**//<><><><><>//**